# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

जा.क्र./महा.वि./गो.वि./ 1154 /२०१८ दिनांक : 23 / 10 /२०१८

प्रती,

मा. अध्यक्ष/प्राचार्य,
डॉ. सी. व्ही रमण विज्ञान महाविद्यालय,
सिरोंचा जि. गडचिरोली.

विषय :— निरंतर संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८, ११० व ११४ अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील चालु अभ्यासक्रमांचे सत्र २०१८—१९ साठी निरंतर संलग्निकरण वाढविण्यासाठी दि. १०/०८/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या अर्जाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (७) अंतर्गत विद्वत परिषदेच्या वतीने आपल्या महाविद्यालयाचा खालील प्रमाणे नमूद अभ्यासक्रमांचा निरंतर संलग्निकरणाचा काळ वाढविण्यास दि. १२/०७/२०१८ ला मान्यता प्रदान केली आहे.

विद्वत परिषदेच्या वतीने स्विकृत केलेल्या शिफारशीनुसार आपल्या महाविद्यालयास सत्र **२०१६—१७** करिता खालील अभ्यासक्रमाकरिता निरंतर संलग्निकरणास विद्यापीठाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विद्याशाखा | अभ्यासक्रम /विषय | प्रवेश क्षमता | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | बी.एस्सी | १२० | सत्र २०१६—१७ करिता |

उपरोक्त प्रमाणे निरंतर संलग्निकरण मान्यता प्रदान केली असून खालील अटीची पुर्तता ३ महिण्याच्या आत पुर्ण करून अनुपालन अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा. त्याअनुषंगाने पुढील सत्राकरिता चौकशी समिती गठीत करण्यात येईल.

१. पुस्तकांची संख्या वाढविणे
२. ग्रंथालय स्वयंचलित करणे
३. जमिन आणि इमारत कागदपत्रे उपलब्ध नाही

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

(डॉ. व्ही. सी. सीलारे)
उपकुलसचिवप्र.
महाविद्यालय विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

आवक/जावक क्रमांक 1644/2018
कार्यालय,डॉ सी.व्हि.रमन विज्ञान
महाविद्यालय सिरोंचा जि. गडचिरोली
दिनांक :- 30/10/2018

प्रतिलिपी माहितीकरिता अग्रेषित :—

१. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
२. मा. संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(टिप: दिलेल्या पत्रात टंकलेखनांमध्ये दोष आढळुन आल्यास सदर दोष(चुक) कार्यालयाच्या लक्षात आणुन देवून सुधारीत प्रत घेवून जावी.)

Fd. To.

Officiating Principal
Dr.C.V.Raman Science College
Sironcha,Dist.Gadchiroli

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५E- Mail : arcollegesectiongug48@gmai